नि दि.दा.क्र. ८२/२०२४
शासन विरुध्द गोविंद
निशाणी क्र. ३३

## अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची साक्ष

मी देवाची शपथ खरे सांगतो की,

माझे नाव – ज्ञानदेव बाबुराव राजे,
वय – ५७ वर्षे, कामधंदा - सहायक फौजदार,
नेमणुक – सातारा पोलीस मुख्यालय,
प्रतिनियुक्ति फलटण, जि. सातारा.

### सरतपासणी सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती सुळ -

दि. ०८/०४/२०२४ रोजी मी भुईंज पोलीस ठाण्यात सहायक फौजदार या पदावर कार्यरत होतो. तेथे मी सन २०२३ पासुन कार्यरत होतो. त्यादिवशी पोलीस ठाणे अधिकारी श्री. कोलवडकर यांनी मला प्रस्तुत अपराध क्र. १२२/२०२४ मधील तपासकाम सोपविले होते. आता मला त्याबाबतच्या लेखी आदेशाची मुळ प्रत दाखविण्यात आली. त्यावर श्री. कोलवडकर यांची मुळ सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.३४** देण्यात येते. तदनंतर मी फिर्यादीने दिलेल्या फिर्यादचे अवलोकन केले. तदनंतर मी घटनास्थळी जावुन दोन पंचांसमक्ष पंचनाम्याची कार्यवाही केली होती. आता मला घटनास्थळाचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी तसेच दोन पंचांची सही असुन त्यातील मजकूर बरोबर आहे. तसेच त्यावर फिर्यादी गांधी यांची देखील घटनास्थळ दाखविणार म्हणून सही आहे. त्या पंचनाम्यास **नि.क्र.३५** देण्यात येते. त्यावेळी फोटो देखील काढण्यात आले होते. आता मला एकूण चार फोटो दाखविण्यात आले. ते तेच असुन अनुक्रमे **आर्टीकल ए ते डी** वर आहेत. त्याकरीताचे पालीस शिपाई सपकाळ यांच्या कडून भारतीय पुरावा कायदा कलम ६५-बी अन्वयेचे प्रमाणपत्र प्राप्त केले.

**२.** पुढील तपासादरम्यान मी टोल नाक्यावर काम करणा-या कामगारांकडे घटनेच्या अनुषंगाने विचारपूस केली व त्यांचे तपास टिपणे नोंदविली. तसेच ज्या ठिकाणाचे नुकसान झाले होते तेथील ७/१२ उतारा प्राप्त केला होता. त्याचप्रमाणे फिर्यादी हा घटनेच्या दिवशी टोल नाक्यावर हजर होता याबाबतचे प्रमाणपत्र मी संबंधीतांकडून प्राप्त केले होते. तपासात मला असे निष्पन्न झाले होते की, आरोपीने जोगेश्वरी मिसळ समोरील सेवा रस्ता खोदुन

त्यामधुन पाईप टाकुन तो हायवे रोडच्या ड्रेनेजमध्ये टाकुन सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केले व त्याव्दारे त्याने रस्त्यावरील पूर्व बाजुचा सिमेंट कॉंक्रेटचा दुभाजक ८ ते १० मिटर तोडून लोकांच्या जीवितास हानी पोहचेल असे क्रुत्य केले होते. त्यामुळे त्याच्याविरुध्द मी दोषारोपपत्र दाखल केले आहे. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात गैरहजर आहे. (नि.क्र.३२ वरील आदेशानुसार आरोपीची आजची गैरहजेरी माफ करण्यात आली आहे.)

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. एम.वाय. शिंदे -**

**३.** हे म्हणणे खरे आहे की, सार्वजनिक मालमत्ता शासनाच्या मालकीची असते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी हा शासकिय कर्मचारी नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसे प्रमाणपत्र तसेच ओळखपत्र मी तपासात प्राप्त केले नव्हते. साक्षीदार पुन्हाहुन सांगतो की, फिर्यादी शासकिय कर्मचारी नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीची शासनाव्दारे नियुक्ती करण्यात आली याबाबतचे कागदपत्र मला प्राप्त झाली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद ही शासनामार्फत दाखल नाही. कथीत घटनास्थळावरील जागा ही शासकिय जागा आहे याबाबतचा अहवाल मी तपासादरम्यान प्राप्त केला नव्हता.

**४.** हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनास्थळालगत जोगेश्वरी मिसळ हे दुकान आहे असे दर्शविण्याकरीता मी दोषारोपपत्रासह कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, भारतीय पुरावा कायदा कलम ६५-बी अन्वयेच्या प्रमाणपत्र आर्टीकल ए ते डी वरील फोटो अजय सपकाळ यांनी दि. ०९/०४/२०२४ रोजी काढल्याचे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरील फोटो गुन्हा दाखल होण्यापूर्वीचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे फोटो व प्रमाणपत्र यांमधे विसंगती आहे. हे म्हणणे खरे आहे की, कथीत पंचनामा कार्यवाहीच्यावेळी आरोपी तेथे हजर नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, कथीत नुकसान कुणी केले हे कोणत्याही साक्षीदाराने प्रत्यक्ष पाहिलेले नाही.

**५.** हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने जोगेश्वरी मिसळ समोरील सेवा रस्ता खोदुन त्यामधुन पाईप टाकुन तो हायवे रोडच्या ड्रेनेजमध्ये टाकुन सार्वजनिक संपत्तीचे

नुकसान केले व त्याव्दारे त्याने रस्त्यावरील पूर्व बाजुचा सिमेंट कॉंक्रेटचा दुभाजक ८ ते १० मिटर तोडून लोकांच्या जीवितास हानी पोहचेल असे क्रुत्य केले होते असे मला तपासात निष्पन्न् झाल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, कथीत घटनास्थळ शासनाच्या मालकीचे नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी कोणत्याही प्रकारे शासकिय अथवा सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरील घटनास्थळ हे शासकीय मालमत्ता असल्याचे दर्शविण्याकरीता मी भुमी अभिलेख कार्यालय तसेच तलाठी कार्यालय येथील अधिकारी व कर्मचारी यांचे जबाब नोंदविले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचे तपासकाम करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगीतलेला संपूर्ण मजकूर खोटा असुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास काही नाही.

समक्ष व श्रवणोत्तर स्वीक्रुत

दि. २७/०२/२०२६

(आर.एम. भेंडे)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, वाई.

RCC No. 09/2023

State Vs. Yashwant
Exh. 32

**Depoistion of P.W.No.6**

/

I do swear in the name of God that,

My name : Rushikesh Rajendra Mane,

Age : 29 years, Occupation : Medical Prarctioner,

R/o. : Central London Romford, United Kingdom

Permanent Address : At post Kudal, Taluka Javali,

District Satara.

**Exmaination in chief by Ld. APP Shri Y.S. Channe -**

I was working as a Medical Officer in Rural Hospital Wai from 6th November, 2022 till 28th January 2023. I am educated upto M.B.B.S. On 18th November, 2022, the patient namely Sachin Sattu Kamble came to me with police yadi for his medical examination. I have brought the MLC register, today. The patient was having history of assault by known person at Nagzari, Post Dhom, Taluka Wai on 17th November, 2022 at 2.00 pm by spade. The patient was examined under MLC No. 757/2022. The paitent was accompanied with his relative. The patient was having scar mark on his forehead between both the eyebrows. Having examined the patient, I found following injury on his person :-

"Contusion over right forearms, due to blunt trauma, size – 5 cm x 2 cm, object – hard and blunt, age – within 12 hours, nature – grievous."

2. The patient was initially referred for orthopedic examination in respect of the injury. Thereafter, I had gone through the x-ray and came to know that the injury was grievous in nature, as there was compound fracture in right ulna bone. The patient was treated as an Out Patient Department (OPD). After examination, I jotted down the injuries in the MLC register first. Thereafter, I issued injury certificate. It is now shown to me. It bears my signature alongwith seal and stamp of the hospital, The contents therein are true and correct. It is at **Exh.33**.

3. The sphead can be termed as a hard and blunt object. The inury mentioned in the certificate (Exh.33) is possible, if someone assaults somebody by means of sphead. Now, I am shown Article-E, it is the sphead. The injury in the certificate is possible by its means. On 20.11.2022, Police Head Constable Pawar sent me a letter for the examination of Article-E. Now, I am shown a carbon copy of said letter. It is already at Exh.30. It bears my signature and stamp as receipant. I gave my opinion on the said letter on the same day. Now, I am shown it. It bears my name, signature and stamp. The contents therein are true and correct. It is at **Exh.34**.

Examination in chief is over.

**Cross examination by Adv. M.Y. Shinde for the accused** :-

4. I am engaged in medical services since last three to four years. Now, I am shown the certificate (Exh.33). It is true to say that the time of examination of the patient is not mentioned therein. It is true to say that the certtificate does not consist of the details regarding date of

alleged assault. Geneally, there are mainly two types of fracture injuries. They can be classified as simple and compound. It is not necessary that the compound fracture is always open fracture. It is true to say that in case of bone fracture, the bone gets ruptured. It is true to say that in case of bone fracture, there is possibility of infection. It is not true to say that in every compound fracture, it is to be operated. Witness volunteers that it depends upon the facts of each case and on the basis of suggesion of orthopedic surgeon. It is true to say that I am unable to opine about it as I am not an Orthopedic Surgeon. It is true to say that I have not brought x-ray report, today.

5. It is true to say that, if someone defends himself by his both hands from the assult by means of sphead, his both hands will be injured. It is true to say that the patient was not having injuries on his both hands. It is true to say that the fracture injury is not visible. It is true to say that if someone fells down from his bullock-cart on any hard and blunt object, the injury mentioned in the certificate (Exh.33) is possible. I cannot recollect as to whether the sphead was sent for its examination alongwith letter (Exh.30). It is true to say that the letter (Exh.30) does not consist any details regarding the sending of sphead alongwith it. It is true to say that there is no mention in my opinion (Exh.34) that I gave it after examination of the spade. It is true to say that I have given that opinion without examination of the spade (Article-E).

6. It is not true to say that the patient did not state any history of alleged assault on 17.11.2022 at 2.00 p.m. by means of spade. It is not true to say that I am deposing falsely that the injury mentioned in the certificate (Exh.32) is possible by means of spade (Article-E). It is true to say that there alteration in the “date” in Exh.30 and Exh.33. It is

true to say that I am cannot say the exact time of injury as it is not mentioned in the certificate (Exh.33).

Cross examination is over.

No Re-examination.